Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# शिवरायांचे आदर्श व्यक्तिमत्व



**आशा सुभाष पाटील**
संशोधक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा यूनिवर्सिटी औरंगाबाद
Email : ajpatil1180@gmail.com

## प्रस्तावना :

आज छत्रपती शिवाजी महाराज आपल्यातून जाऊन सुमारे 341 वर्षे झालेली आहेत. तरी देखील जनमानसावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव अजूनही खोलवर जाणवतो. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांच्याच मनात शिवरायांबद्दल अपार श्रद्धा व आदर आपणास दिसून येतो. सामान्यातील सामान्यपासून थोर व्यक्तींच्या मनावर महाराजांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा ठसा कायमस्वरूपी उमटलेला आहे. आजही छत्रपती शिवरायांच्या नाम घोशांणी तरुण पिढीमध्ये उत्साहाचा संचार होत असल्याचे प्रत्ययास येत आहे. देशातील प्रत्येकालाच शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते असे वाटते, कारण महाराजांनी ज्या काही कल्याणकारी योजना केल्या त्या सर्वसामान्य लोकांसाठी केल्या असल्याने त्यांना शिवराय हे रयतेचे हितकर्ता होते असे वाटणे स्वाभाविक आहे. शिवरायांचे संपूर्ण जीवनचरित्र आदर्श होते. त्यांच्या बोलण्यातून, विचारांतून, व वर्तनातून त्यांचे आदर्श पहावयास मिळतात. शिवराय हे एक आदर्श पुत्र, पती, पिता व रयतेला मायेची ऊब देणारे "जाणता राजा" होते. तसेच त्यांचा सर्व धर्माविषयीचा आदर असे सर्व अद्वितीय गुण त्यांच्या जीवनचरित्रातून अनुभवता येतात. शिवराय हे त्यांच्या वारसा हक्काने मिळालेल्या गादीवर बसून राज्य करणारे राजा नसून त्यांनी त्यांच्या स्वकर्तृत्वाने, मेहनतीने, हिंमतीने, चिकाटीने, धैर्याने, धाडसाने, प्रामाणिकपणाने व नैतिकतेने राज्य करणारे तसेच दुसऱ्यांच्या वर्चस्वखाली दबावात न राहता स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करून शून्यातून जग निर्माण करणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते. त्यांनी फक्त मराठ्यांपूरताच मर्यादित लोककल्याणकारी योजना न करता त्यांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळात इतर धर्माच्या लोकांनाही त्यांच्या कामगिरीनुसार सन्मानाचे स्थान देऊन आपल्या कारभारात समाविष्ट करून घेतले होते आणि ते त्यांच्या या दूरदृष्टीकोनामुळे जनतेच्या हृदयात जागा करू शकले.